आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ एप्रिल २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन, राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- शालेय बसचे शुल्क प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव

- नाशिक जिल्ह्यात ट्रक आणि पिकअप यांच्या अपघातात चार जणांचा मृत्यू

**आणि**

- आशियाई बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीची अंतिम फेरीत धडक

**<><><><><><>**

थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. याविषयीचा अधिक वृत्तांत आता ऐकुया…

**व्हीसी (१.३३ सेकंद)**

(संसद भवनात प्रेरणा स्थळी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभा सभापती ओम बिर्ला आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि अन्य मंत्र्यांनी फुले यांना आदरांजली वाहिली. राज्यात लोकभवन इथे राज्यपालांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. विधान भवनातही महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.
२०२७ हे द्विशताब्दी वर्ष राज्यात उत्साहात साजरं करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. या अनुषंगानं शालेय शिक्षण विभाग आजपासून पुढच्या वर्षी १० एप्रिलपर्यंत राज्यातल्या सर्व शाळांमध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक आणि

सांस्कृतिक उपक्रम राबवणार आहे. सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं तसंच सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये महात्मा फुले यांच्या प्रतिमेचं पूजन करून या उपक्रमाची सुरुवात झाली.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजवण्यासाठी शाळांमध्ये वाचनालयं ज्ञानकेंद्र म्हणून विकसित केली जाणार आहेत. तसेच फुले यांच्या विचारांवर आधारित व्याख्याने, वेबिनार, परिसंवाद आणि चर्चासत्रांचं आयोजन करण्यात येणार आहे.

**अकोला** इथं अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीनं जयंती महोत्सवाचं आयोजन केलं होतं. **बुलढाणा** जिल्ह्यातल्या जळगाव जामोद पंचायत समितीनं महात्मा फुलेंच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं होतं. राज्याचे आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी **धुळे** जिल्ह्यातल्या शिरपूर शहरातल्या वरवाडे येथे महात्मा फुलेंना आदरांजली वाहिली.)

**<><><><><><>**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २००व्या जयंतीनिमित्त त्यांचं गाव खानवडी इथे अभिनव जिल्हा परिषद शाळा सुरु करणे ही त्यांच्या कार्याला खरी मानवंदना ठरेल असं राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुण्यात खानवडी इथे ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळेचं उदघाटन आणि लोकार्पण आज झालं त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री छगन भुजबळ, चंद्रकांत पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते. पुणे महापालिकेने आज १०० अटल टिंकरिंग लॅब्जचे उदघाटन केलं आहे. तसेच राज्याच्या कौशल्य विकास विभागाने आजच एका कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उदघाटन केलं असून सरकार अशा प्रकारची १ हजार केंद्रं उभारणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केलं. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०२२ साली या शाळेची पायाभरणी केली

होती. सरकार आणि खाजगी कंपन्यांच्या देणग्यांमधून या शाळेचं बांधकाम पूर्ण झालं आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाने आयोजित केलेल्या माय भारत बजेट क्वेस्ट २०२६ च्या मुंबई विभागाची अंतिम फेरी १२ आणि १३ एप्रिल रोजी मुंबईतल्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठात होणार आहे. माय युवा भारत महाराष्ट्र आणि गोव्याचे राज्य संचालक अमित पुंडे यांनी आज मुंबईत वार्ताहरांना ही माहिती दिली. या दोन दिवसीय विचारमंथन सत्रात केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ शी निगडित विषयांवर होणाऱ्या चर्चेत शिक्षणतज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि विषय विशेषज्ञ सहभागी होणार आहेत. देशभरातील १७ ठिकाणांहून १५ हजाराहून अधिक युवक यात सहभागी होणार आहेत. या दरम्यान महिला युवा संसददेखील आयोजित होणार असून त्यात महिला आरक्षण विधेयकावर संसदीय पद्धतीने चर्चा होईल.

**<><><><><>**

मुंबईत एन एफ डी सी अर्थात राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाला केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी आज भेट देत इथल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी महामंडळाच्या प्रांगणात वृक्षारोपणही केलं. त्यानंतर त्यांनी भारतीय राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट दिली. वेव्हज २०२५ सारख्या जागतिक माध्यम उपक्रमांमधल्या भारताच्या सहभागातून घेतलेल्या घटकांबाबत तसंच संग्रहालयाच्या विकासाबाबत अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती दिली. कुमार यांनी एन एफ डी सी प्रांगणातल्या आय आय सी टी मधल्या सुविधांचाही यावेळी आढावा घेतला.

**<><><><><>**

शालेय बसचे शुल्क प्रादेशिक वाहतूक प्राधिकरणाच्या माध्यमातून निश्चित करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारनं सादर केला आहे. यानुसार पालकांकडून केवळ मासिक शुल्क घेतले जाईल, एकरकमी आगाऊ रक्कम घ्यायला सरकारनं मनाई केली आहे. मोटार वाहन कायद्याच्या अंतर्गत परिवहन विभागानं शालेय बस नियमनाच्या संदर्भात अधिसूचना जाहीर केली आहे. त्यात हे नमूद केलं आहे.

बसमधला विद्यार्थी किती वाजता आला आणि किती वाजता उतरला या वेळेसह त्याची दैनिक उपस्थिती नोंद बंधनकारक करण्यात आली आहे. पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनात महिला परिचारिका आवश्यक असणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे. सर्व शालेय बस आणि व्हॅनमध्ये GPS-आधारित Vehicle Location Tracking Device, पॅनिक बटण, अग्निसुरक्षा यंत्रणा, CCTV तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्ट सक्तीचे आहे. बस चालक, वाहक आणि इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्रही सरकारनं अनिवार्य केलं आहे.

आता प्रत्येक शाळेत परिवहन समिती कार्यरत असेल आणि भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण समितीच्या माध्यमातून होईल. शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण आणि परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

<><><><><><>

नाशिक जिल्ह्यात सिन्नर तालुक्याच्या पूर्व भागात पंचाळे-शहा रस्त्यावर काल मध्यरात्री दोन वाजण्याच्या सुमाराला ट्रक आणि पिकअप यांच्यात जोरदार धडक होऊन पिकअप कारनं पेट घेतल्यानं चार जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन महिलांचा समावेश आहे. पशुखाद्य भरलेल्या ट्रकने दिलेल्या धडकेत पिकअप कार सुमारे १०० फूट ओढत नेली. यात डांबरी रस्त्यावर घर्षण होऊन पिकअप कार पेटली असावी असा अंदाज अग्निशामक दलानं व्यक्त केला आहे.

<><><><><><>

हिंगोली जिल्ह्यात आज सकाळी ८ वाजून ४५ मिनिटांनी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. हा भूकंप ४.७ रिक्टर स्केल तीव्रतेचा होता. भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली गावच्या उत्तरेस पांगरा शिंदे परिसरात होता. हादरे जाणवताच नागरिक घराबाहेर पडले. भूकंपाच्या धक्क्यानं वसमत तालुक्यातील अनेक गावांतल्या घरांना तडे गेले. पांगरा शिंदे गावातल्या तीन मातीच्या घरांच्या भिंती कोसळल्या.  या भूकंपाने नांदेडमधल्या गावांमध्येही हादरे जाणवले. अर्धापूर, मुदखेड, लोहा, नायगाव, हदगाव, हिमायतनगर तालुक्यातल्या अनेक गावात धक्के जाणवले. परिस्थितीवर जिल्हा प्रशासन पूर्णपणे लक्ष ठेवून असून नागरिकांना घाबरून न जाण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

<><><><><><>

चीनमध्ये निंगबो इथे सुरु असलेल्या बॅडमिंटन आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आयुष शेट्टीने पुरुष एकेरी गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्यामुळे भारताचं किमान रौप्यपदक निश्चित झालं आहे. जागतिक मानांकनात २५व्या स्थानावरच्या आयुषने उपांत्य फेरीत अग्रमानांकित आणि गतविजेता थायलंडच्या कुणलावूत वीतिडसन याला तीन गेम्सच्या सामन्यात अटीतटीची झुंज दिली.  अंतिम सामन्यात आयुषचा मुकाबला चिनी तैपेईच्या चौथ्या मानांकित चोऊ

तीन चेन किंवा चीनच्या द्वितीय मानांकित शी यु कि बरोबर होईल. भारताच्या दिनेश खन्नाने १९६५ सालामध्ये या स्पर्धेत पुरुष एकेरीत सुवर्णपदक मिळवलं होतं, त्यांनतर आता आयुष शेट्टी हा अंतिम फेरी गाठणारा दुसरा भारतीय ठरला आहे.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेटमध्ये आज पंजाब किंग्सचा सामना सनराइजर्स हैदराबादशी दुपारी साडेतीन वाजता चंदिगढमध्ये पीसीए क्रिकेट स्टेडियमवर सुरु होणार आहे. पंजाब किंग्जने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

आजचा दुसरा सामना चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्समध्ये होणार असून हा सामना चेन्नईमध्ये एम ए चिदंबरम स्टेडियमवर आज संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होणार आहे.

**//<><><><><><>//**